MHAH230003822024

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १५८/२०२४ मधील नि. १५ वरील आदेश</u>.**

(भाऊ बापू कातोरे व इतर वि. अर्जुन गंगाराम कातोरे व इतर)

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी त्यांच्या अर्जात कथन केले आहे की, मुदतीत कैफियत देणे आवश्यक होते. परंतु कैफियतीसाठी आवश्यक ती कागदपत्रे व माहिती वेळेवर उपलब्ध न झाल्याने मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. प्रतिवादी यांनी जाणिवपुर्वक विलंब केलेला नाही. कैफीयत अभिलेखावर न आल्यास प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. तरी कैफीयत देण्यास परवानगी मिळावी असे त्यांचे कथन आहे.

३. वादीने त्याच अर्जावर म्हणणे देवून अर्जास हरकत दर्शविली. त्यांच्या कथनानुसार, अर्ज खरा, बरोबर व कायदेशीर नाही. अर्जातील कारण संयुक्तिक नाही. केवळ वादीस त्रास देण्याकरीता प्रतिवादीने जाणून बुजुन उशिर केला आहे. सबब अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, दि. १९/०७/२०२४ रोजी प्रतिवादी क्र. १ व २ यांना समन्सची बजावणी झाली व दि.१४/०८/२०२४ रोजी ते वकीलांमार्फत प्रकरणात हजर झाले. समन्स बजावणीपासून कमीत कमी ३० व जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत देणे आवश्यक होते. परंतु त्यांनी विहित मुदतीत कैफीयत दिलेली नाही. प्रतिवादी

क्र.१ व २ यांनी प्रस्तुत अर्ज दि. १२/१२/२०२४ रोजी कैफियतीसह दाखल केला. प्रस्तुत दावा निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी दाखल केला असल्यामुळे प्रतिवादी यांना कैफीयत देण्यास संधी न दिल्यास मुळ वादमुद्दा गुणदोषावर निर्णित न होता नवीन प्रकरण दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याउलट कैफीयत अभिलेखावर आल्यास उभय पक्षकारांचा पुरावा होवून वादातील मुदयांचे एकाचवेळी गुणदोषावर निरसन होईल. त्यामुळे कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायाचे दृष्टीने संयुक्तिक ठरणार आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

अर्ज (नि.१५) मंजूर करण्यात येत आहे.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN

Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2025.02.05 13:23:50 +0530

श्रीगोंदा.

दिनांक ०५/०२/२०२५.

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.